# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{प्रकल्प -1 विभाग }**

नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा – वडपाखड गड्डीगोदाम येथील न.भु.क्रं. 948 वर नविन कत्तलखाना इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

सदर इमारत कत्तलखाना म्हणून उपयोगात येण्याचे दृष्टीने Animal Waste ( विशेषत: जनावरांचे रक्त, साफ-सफाई पाणी व इतर द्रव्य ) यांचा योग्य निपटारा करण्याकरिता सांडपाणी प्रक्रिया केंद्र ( ETP ) उभारणी करणे आवश्यक आहे. त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. 19.02.25 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. करीता नविन ( ETP ) लावण्याचे प्राकलन रु. 42,01,840/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

टिप :-

1. प्रस्तुत कामाकरिता सन 2024 – 25 चे अंदाजपत्रका मधील पद शिर्ष क्रं. A44801272611 अंतर्गत तरतुद उपलब्ध आहे
2. सदर कामाकरिता मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
3. सदर कामाकरिता मा. मुख्य अभियंता यांची दि. 10.02.2025 रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
4. विस्तृत टिपण्णी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1274 **/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 03/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प -१), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा – वडपाखड गड्डीगोदाम येथील न.भु.क्रं. 948 वर नविन कत्तलखाना इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

सदर इमारत कत्तलखाना म्हणून उपयोगात येण्याचे दृष्टीने Animal Waste ( विशेषत: जनावरांचे रक्त, साफ-सफाई पाणी व इतर द्रव्य ) यांचा योग्य निपटारा करण्याकरिता सांडपाणी प्रक्रिया केंद्र ( ETP ) उभारणी करणे आवश्यक आहे. त्यास मा. आयुक्त महोदयांनी दि. 19.02.25 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. करीता नविन ( ETP ) लावण्याचे प्राकलन रु. 42,01,840/- राशीला प्रशासकीय मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.